# सरकारी कामगार अधिकारी यांचे कार्यालय

**प्रशासकीय ईमारत, दुसरा माळा, हॉल क्र. 2, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,**
**यवतमाळ - 445001, फोन नं. 07232 243447**

==========================================================================

## विषय माहितीचा अधिकारी अधिनियम, 2005 चे कलम 4 अंतर्गत 1 ते 17 बार्बीविषयी माहिती.

### 1) कलम 4 (1) (ख) (1)

**कार्यालयाची रचना :-** सरकारी कामगार अधिकारी कार्यालय यवतमाळ या कार्यालयाच्या अधिपत्त्याखाली व नियंत्रणाखाली खालील प्रमाणे दुकाने निरिक्षक कार्यालय असून त्यांचे कार्यक्षेत्राबाबतची माहिती खालील प्रमाणे आहेत.

(1) निरिक्षक दुकाने व संस्था यांचे कार्यालय पुसद :- या कार्यालयाच्या अंतर्गत नगर परिषद क्षेत्र पुसद, दारव्हा, आर्णी व दिग्रस येतात.

(2) निरिक्षक दुकाने व संस्था यांचे कार्यालय वणी :- या कार्यालयाच्या अंतर्गत नगर परिषद क्षेत्र वणी व पांढरकवडा येतात.

(3) निरिक्षक दुकाने व संस्था यांचे कार्यालय उमरखेड :- या कार्यालयाच्या अंतर्गत नगर परिषद क्षेत्र उमरखेड येतो.

**कार्यालयाची कार्ये :-** या कार्यालयाव्दारे औद्योगिक शांतता कायम राखणे व कामगार कायद्याची अंमलबजावणी करणे ईत्यादी कार्ये केली जातात.

**कार्यालयाची कर्तव्ये :-** अधिनियमांतर्गत निरिक्षण शेरे पारित करणे, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनिमय, 1948 अंतर्गत आस्थापनांची नोंदणी व नुतनीकरण करणे, कर्मचारी अथवा कामगार संघटनेने उपस्थित केलेल्या विवादात मध्यस्थी करुन विवादात समेट घडवून आणणे अधिनियमांतर्गत आढळून आलेल्या त्रुटीं बाबत न्यायालयीन कार्यवाही करणे.

### 2) कलम 4 (1) (ख) (2)

यवतमाळ जिल्हयात कामगार विभागात सरकारी कामगार अधिकारी वर्ग-2 चे 1 पद असून ते पद भरलेले आहे, निरिक्षक दुकाने व संस्था श्रेणी 2 वर्ग 3 यामध्ये 4 पदांपैकी 3 पदे भरलेली आहेत व 1 पद रिक्त आहे, लिपिक टंकलेखक वर्ग 3 यामध्ये 4 पदे असून चारही पदे भरलेली आहे तसेच शिपाई वर्ग-4 या पदाची 5 पदे मंजूर असून त्यापैकी 3 पदे भरलेली आहेत व 2 पदे रिक्त आहे. सरकारी कामगार अधिकारी हे सर्व

कामगार अधिनियमांतर्गत निरिक्षक म्हणून कार्यरत आहे. दुकाने निरिक्षक हे महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, 1948 अंतर्गत निरिक्षक म्हणून कार्यरत आहे.
कार्यालयातील लिपिक/टंकलेखक हे शाखानिहाय कर्तव्य बजावते.

**3) कलम 4 (1) (ख) (3)**

या कार्यालयाच्या अधिपत्त्याखालील कार्यरत दुकाने निरिक्षक मासिक दैनंदिनी तयार करतात व त्यांची मासिक आढावा बैठक दरमहा घेण्यात येते. उपरोक्त दुकाने निरीक्षक कार्यालयावर या कार्यालयाचे नियंत्रण असून त्यांचे उत्तरदायीत्व या कार्यालयावर आहे.

**4) कलम 4 (1) (ख) (4)**

सरकारी कामगार अधिकारी यांचे निरिक्षण भेटीचे उद्दीष्ट दरमहा 75, दुकाने निरिक्षक यांचे निरिक्षण उद्दीष्ट दरमहा 125 व 60 भेटी ठरविण्यात आले असून बालकामगार प्रतिबंध व नियमन अधिनियम, 1986 अंतर्गत 10 निरिक्षण भेटीचे उद्दीष्ट ठरविण्यांत आले आहे.

**5) कलम 4 (1) (ख) (5)**

महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, 1948 अंतर्गत आस्थापनांची नोंदणी करण्यांत येवून आस्थापनेस नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येते व त्यासंबंधीचे अभिलेख ठेवण्यांत येते. महाराष्ट्र शासनाने सदर अधिनियमांतर्गत नोंदणी, नुतनीकरण,बदल ईत्यादी ची प्रक्रीया ऑनलाईन सुरु केलेली असून आस्थापना धारकांना ऑनलाईन पध्दतीने सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहे.

**6) कलम 4 (1) (ख) (6)**

स्थानिक क्षेत्र यवतमाळ येथिल अभिलेख यवतमाळ कार्यालयात तसेच वणी व पांढरकवडा येथिल अभिलेख वणी कार्यालयात, उमरखेड येथिल अभिलेख उमरखेड कार्यालयात तसेच पुसद, दारव्हा, दिग्रस व आर्णी येथिल अभिलेख पुसद कार्यालयात ठेवण्यांत येते.
अधिनियमांतर्गत तरतुदीनुसार ऑनलाईन पध्दतीने नोंदणी प्रमाणपत्र आस्थापना धारकास देण्यात येते.

**7) कलम 4 (1) (ख) (7)**

या कार्यालयाचे स्वत:चे पुरती धोरण नाही. कोणत्याही कामगार अथवा कामगार संघटनेची तक्रार असल्यास ती कोणत्याही वेळी लेखी स्वरुपात स्विकारण्यांत येते व नियमानुसार त्यावर कार्यवाही करण्यांत येते.

**8) कलम 4 (1) (ख) (8)**

या कार्यालयाव्दारे वेठबिगार अधिनियमांतर्गत जिल्हास्तरीय व उपविभाग स्तरीय दक्षता समिती कार्यरत आहे. बालकामगार प्रतिबंध व नियमन अधिनियम, 1986 अंतर्गत

कृतिदलाची स्थापना करण्यांत आलेली आहे. सदर समित्यांचे मा. जिल्हाधिकारी अध्यक्ष असून कामगार अधिकारी हे सदस्य सचिव आहेत. समितीच्या बैठकीकरीता समितीचे पदाधिकारी उपस्थित राहतात बैठक इतर लोकांसाठी खुली नाही परंतु बैठकीचे इतिवृत्त जनतेस पहावयास मिळण्याजोगे आहे.

**9) कलम 4 (1) (ख) (9)**

या कार्यालयातील अधिका-यांची मासिक दैनंदिनी व अधिनियमाच्या अंमलबजावणीबाबतचा अहवाल मा. अपर कामगार आयुक्त, नागपुर (विभागप्रमुख) यांना दरमहा पाठविण्यांत येते.

**10) कलम 4 (1) (ख) (10)**

या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची वेतनश्रेणी खालीलप्रमाणे आहे.

1) सरकारी कामगार अधिकारी वे.श्रे.पे बॅन्ड 9300-34800 ग्रे.पे. 4400
2) किमान वेतन निरिक्षक (कृषि) वे.श्रे.पे बॅन्ड 9300-34800 ग्रे.पे. 4200
3) दुकाने निरिक्षक वे.श्रे.पे बॅन्ड 5200-20200 ग्रे.पे. 2400
4) लिपिक/ टंकलेखक वे.श्रे.पे बॅन्ड 5200-20200 ग्रे.पे. 1900
5) शिपाई वे.श्रे.पे बॅन्ड 4470-7440 ग्रे.पे. 1300

या कार्यालयातील कर्मचा-यांना शासनाच्या नियमानुसार नुकसान भरपाई देण्यात येते.

**11) कलम 4 (1) (ख) (11)**

या कार्यालयाकडून कोणत्याही योजना राबविण्यांत येत नाही त्यामुळे प्रस्तावित खर्च, नेमुन दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरीत केलेल्या रकमांचा अहवाल निरंक आहे. या व्यतिरिक्त सद्यस्थितीत कल्याणकारी मंडळाच्या योजना राबविण्यांत येते परंतु त्याकरीता योजना तयार करणे वा खर्चाबाबतचे संपुर्ण नियोजन मंडळाकडून करण्यांत येते.

**12) कलम 4 (1) (ख) (12)**

या कार्यालयाकडून अर्थसहाय कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यांत येत नाही.

**13) कलम 4 (1) (ख) (13)**

या कार्यालयाव्दारे व्यक्तींना सवलती, परवाने किंवा प्राधिकार पत्रे देण्यात येत नाही. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, 1948 अंतर्गत आस्थापनांची नोंदणी करण्यांत येवून आस्थापनेस नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येते व त्यासंबंधीचे अभिलेख ठेवण्यांत येते. महाराष्ट्र शासनाने सदर अधिनियमांतर्गत नोंदणी, नुतनीकरण,बदल ईत्यादी ची प्रक्रीया ऑनलाईन सुरु केलेली असून आस्थापना धारकांना ऑनलाईन पध्दतीने सर्व सुविधा

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहे व सदर अभिलेख ऑनलाईन पध्दतीने संग्रहीत केल्या जाते.

**14) कलम 4 (1) (ख) (14)**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र दुकने व आस्थापना अधिनियम 1948 अंतर्गत नोंदणी, नुतनीकरण,बदल ईत्यादी ची प्रक्रीया ऑनलाईन सुरु केलेली असून आस्थापना धारकांना ऑनलाईन पध्दतीने सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहे व सदर अभिलेख ऑनलाईन पध्दतीने संग्रहीत केल्या जाते व हा संपुर्ण डेटा कार्यालयात व शासनाकडे ऑनलाईन उपलब्ध आहे.

**15) कलम 4 (1) (ख) (15)**

माहिती मिळविण्याकरीता नागरिकांच्या सोयीसाठी दुकाने निरीक्षक कार्यालय, वणी, पुसद व उमरखेड या कार्यालयामध्ये कार्यरत असलेले दुकाने निरीक्षक यांचे कडे माहितीचा अर्ज कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येतो व सदर अर्ज यवतमाळ कार्यालयाकडून विहीत मुदतीत निकाली काढून नागरिकांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येते. जुन्या सहायक जनमाहिती अधिकारी सेवानिवृत्त झाल्यानंतर नविन सहायक जनमाहिती अधिकारी यांचे नावाची अधिसुचना निर्गमित झालेली नाही.

**16) कलम 4 (1) (ख) (16)**

1) **राजु दे. गुल्हाने**
(सरकारी कामगार अधिकारी),
सरकारी कामगार अधिकारी
यांचे कार्यालय, प्रशासकीय ईमारत,
दुसरा माळा, हॉल क्र.2, जिल्हाधिकारी
कार्यालय परिसर, यवतमाळ - 445001
दुरध्वनी क्र. 07232-243447
फॅक्स क्र. 07232-243447
ईमेल :- gloytlms@gmail.com

शासकीय जनमाहिती अधिकारी
तथा
सरकारी कामगार अधिकारी,
यवतमाळ

2) **जगदिश ग. कडू**
(निरिक्षक दुकाने व संस्था),
सरकारी कामगार अधिकारी
यांचे कार्यालय, प्रशासकीय ईमारत,
दुसरा माळा, हॉल क्र.2, जिल्हाधिकारी

सहायक जनमाहिती अधिकारी
तथा
निरिक्षक दुकाने व संस्था ,
यवतमाळ

कार्यालय परिसर, यवतमाळ - 445001
दुरध्वनी क्र. 07232-243447
फॅक्स क्र. 07232-243447
ईमेल :- gloytlms@gmail.com

3) राजेश भा. आडे
(सहायक कामगार आयुक्त)
सहायक कामगार आयुक्त
यांचे कार्यालय, दुरसंचार विभागारसमोर
कॅम्प रोड, अमरावती
दुरध्वनी क्र. 0721-2662115
फॅक्स क्र. 0721-2662115

अपिलीय प्राधिकारी
तथा
सहायक कामगार आयुक्त,
अमरावती

**17) कलम 4 (1) (ख) (17)**

विहीत करण्यांत येईल अशी इतर माहिती निरंक आहे.

(राजु दे. गुल्हाने)
राज्य जनमाहिती अधिकारी तथा
सरकारी कामगार अधिकारी, यवतमाळ